# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५
## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

| | | |
|---|---|---|
| (१) | **मुख्यमंत्री** | : "महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील." |
| (२) | **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** | : "महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |
| (३) | **परिवहन मंत्री** | : "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक प्रशासन अहवाल" सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**चार : लक्षवेधी सूचना (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री. अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"धनदा कॉर्पोरेशन ही मुंबई शेअर बाजारात नोंदणीकृत कंपनी असून, छत्रपती संभाजीनगर येथील VITS हॉटेल ही तिची महत्वाची मालमत्ता असणे, काही भागधारकांनी प्रशासनावर दबाव टाकून MPID कायद्यांतर्गत कारवाईस प्रवृत्त केलेले असणे, सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणांत MPID कायदा लागू होत नाही, असे तोंडी निरीक्षण नोंदवलेले असणे, तरीही उपविभागीय अधिकाऱ्यांनी काही भागधारकांशी हितसंबंध ठेऊन हॉटेलची किंमत जाणीवपूर्वक कमी दाखवून लिलाव प्रक्रियेस प्रारंभ केलेला असणे, हॉटेल व्यवसायातून ६ कोटींचा नफा जमा असूनही कर्मचारी पगार व BSE शुल्क थकित ठेवलेले असणे, कोणताही न्यायालयीन आदेश नसताना दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ पासून हॉटेल

अप्रकाशित प्रत

बंद केल्यामुळे १५० कामगार व छोटे व्यावसायिक अडचणीत आलेले असणे, कंपनीने नव्या भागधारकांच्या मदतीने पुनरुज्जीवनाचा निर्णय घेतलेला असतांना लिलाव प्रक्रियेने त्यात अडथळे निर्माण होणे, या पार्श्वभूमीवर भागधारक व कामगारांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या भूमिकेची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील अंजूर फाटा-दापोडा रस्त्यावरील वळ गावाच्या हद्दीत दिनांक १४ जून, २०२५ रोजी सायंकाळी केमिकल साठवलेल्या गोदामाला भीषण आग लागणे, आगीत १२ गोदामे जळून खाक होणे, वळ ग्रामपंचायत भोईर कॉम्प्लेक्स या गोदाम संकुलातील आठ गोदामांत मोठ्या प्रमाणावर केमिकल ड्रम व पावडर साठवलेल्या ठिकाणी सुरुवातीला आग लागणे, गोदामात केमिकल असल्याने आग झपाट्याने पसरणे, गोदामात मोठ्या प्रमाणात ज्वलनशील केमिकल असल्याने संपूर्ण परिसरात उग्र वास व धूर पसरला असणे, अंजूर फाटा ते दापोडा रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी असल्याने पाणी घेऊन येणारे टँकर घटनास्थळी दाखल होण्यास अडचण निर्माण झाली असणे, या आगीमुळे नागरिकांना डोळे चुरचुरणे, श्वसनाचा त्रास जाणवू लागणे, सदरहू आगीची चौकशी करून संबंधीत गोदाम मालकावर कारवाई करण्याची आवश्यकता, या भागात अनेक गोदामे असून या सर्वांची चौकशी करून ज्वलनशील केमिकल असणाऱ्या गोदामांवर कारवाई करण्याची गरज, भविष्यात अशा आग लागून जिवीत वा वित्तहानी होऊ नये याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री.धीरज लिंगाडे ,वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"राज्यात नगरपालिका क्षेत्रामध्ये व्यावसायिक जागा भाड्याने देतांना जागेचा कर ५४ टक्के आकारण्यात येणे, सदरचा दर भुईभाड्याच्या ऐवजी मालमत्ताप्रमाणे प्रॉपर्टीच्या रेडिरेकनरच्या आधारे बाजूला काढून आकारला गेला तर तो सर्वांनाच मदतकारक होणार असणे, उदाहरणार्थ एखाद्या लेनमध्ये दोन इमारती असेल तर एक बिल्डिंग व्यावसायिक असेल व वरीलप्रमाणे वार्षिक भाड्यामध्ये ५४ टक्के कर आकारला जाणे, त्याचा बिल्डिंग मालक एकच असला तरी त्यास वेगळा टॅक्स आकारला जाणे, नागपूर महानगरपालिकेत रेडिरेकनरच्या आधारे टॅक्स आकारात असणे, यामुळे नागपूर महानगरपालिकेच्या धर्तीवर

असुधारित प्रत

राज्यातील नगरपालिका क्षेत्रामध्ये एवढेच मूल्य काढून व्यावसायिक टॅक्स कर आकारणी व्हावी व दर आकारणीही कमी व्हावी अशी मागणी असणे, मात्र याकडे शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(४) **श्री.एकनाथराव खडसे** , **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सरदार सरोवर प्रकल्पांतर्गत महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश या चार राज्यात नर्मदा नदीचे पाणी वाटपाचा करार सन १९७९ मध्ये नर्मदा जलविवाद न्यायाधिकरण स्थापन करुन करण्यात येणे, त्यानुसार मध्यप्रदेश-१८.२५ दश लक्ष एकर फुट, गुजरात-९.० दश लक्ष एकर फुट, महाराष्ट्र-०.२५ दशलक्ष एकर फुट, राजस्थान-०.५० दक्षलक्ष एकर फुट असा करार करण्यात येणे, या करारानुसार महाराष्ट्राला १०.८९ टीएमसी पाणी नर्मदेतून मिळणे प्रस्तावित असणे, या कराराची मुदत सन १९७९ पासुन पुढे ४५ वर्षापर्यंत लागू असणे, त्यानुसार सादर करावयाची मुदत सन २०२४ साली संपलेली असणे, या ४५ वर्षात महाराष्ट्र शासनाने आपल्या हिस्यातील १०.८९ टीएमसी पाणी वापराबाबत अद्यापतरी ठोस उपाययोजना न करणे, यासंदर्भात केवळ नंदुरबार जिल्ह्यात धडगाव तालुक्यात नर्मदा-तापी वळण योजना प्रस्तावित असणे, या योजनेचे प्राथमिक स्तरावर फक्त सर्वेक्षण करणे, अधिकृतपणे अद्यापही या योजनेला प्रशासकिय मान्यता न मिळणे, त्यामुळे महाराष्ट्राला मिळणाऱ्या १०.८९ टीएमसी पाण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होणे, ४५ वर्षात पाणी वापराबाबत नियोजन न केल्याने महाराष्ट्राला पाण्याची गरजच नाही असा समज होऊन आपल्या हिस्स्याच्या पाण्यावरील अधिकार गमवावा लागण्याची निर्माण झालेली परिस्थिती, महाराष्ट्र शासनाने सदर करारास मुदत वाढ घेण्यासाठी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठवून नर्मदा जलविवाद न्यायाधिकरणाचा पूनर्करार करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री.अमोल मिटकरी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोट (जि. अकोला) व जिनिंग धारक यांच्या संगनमताने जवळपास ५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये उघडकीस येणे, या कृषी उत्पन्न बाजार समितीने मोठ्या प्रमाणात नियमबाह्य कारभार केल्याबाबत अप्पर मुख्य सचिव (पणन), महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जुलै, २०२४ मध्ये केलेल्या तक्रारीनुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना चौकशीचे दिलेले आदेश, सदरहू चौकशीस जाणूनबूजन केलेला विलंब तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीने नियमबाह्यरित्या

केलेल्या नियुक्त्या,पदोन्नती तसेच शुल्क वसुलीमधील अफरातफर, सुपरव्हिजन फी ची रक्कम वसुल करुन न भरणे, शेतकऱ्यांच्या पैश्याचा चूकारा वेळेवर न देणे, सोयी-सुविधा न देणे, कापूस बाजार शुल्क आकारणीमध्ये अफरातफर करणे, खोटा, त्रोटक व चूकीचा अहवाल वरिष्ठांकडे देणे, न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न करणे, वरिष्ठ कार्यालयास चुकीची माहिती देणे, तसेच नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी, अकोट, खरेदी-विक्री सहकारी संघ, अकोट यांनी शासकीय ज्वारी खरेदीमध्ये केलेला भ्रष्टाचार, या सर्व बाबी लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोटच्या संचालक मंडळांनी केलेल्या अनियमित कारभाराची चौकशी करुन संचालक मंडळ बरखास्त करण्याची व दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच या बाजार समितीचे विभाजन करुन नविन चौहोट्टा बाजार समिती निर्माण करण्याची गरज, या सर्व बाबी विचारात घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(६) **ॲड.अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अंधेरी (पश्चिम) येथील लोखंडवाला बॅक रोड परिसरातील सी.टी.एस क्र.१६१ नगर भू.क्र.१/१६७, १/१६८, १/१६९ येथील सुमारे ३०० एकर पेक्षा अधिक क्षेत्र हे समुद्रकिनारी आणि कांदळवन क्षेत्रालगत बेकायदेशीरपणे कांदळवन कत्तल, वृक्षतोड व अवैध भरणीकरुन जमीन सपाटीकरण केले जात असल्याचे माहे जुन, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, यामुळे पर्यावरणीय आणि जैवविविधतेचा गंभीर ऱ्हास होणे, खाजगी मिळकतीवर कांदळवन क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत बफरझोन येत असूनही या ठिकाणी अनधिकृत भरणी केल्याचे निष्पन्न होणे, सदर बेकायदेशीर भरणी करुन किनारी नियमन क्षेत्र (सीआरझेड) नियम, २०११ आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ यांचे झालेले उल्लंघन जमीन मालक मेसर्स उषा मधु डेव्हलपर्स को.ऑ.हौ. सोसायटी आणि भरणी करणारे मेसर्स महालक्ष्मी इंटरप्रायझेस यांच्याविरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ (१) आणि (२) अंतर्गत ओशिवरा पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल, वन विभागाने स्थळ पाहणी दरम्यान स्थानिक पोलीस प्रशासन आणि सीटी सर्व्हे (सी.टी.एस) अधिकारी उपस्थिती नसल्याने कार्यवाही अपुरी राहिल्याचे समोर येणे, या परिसरात अनेक वर्षापासून स्थलांतरित पक्षी येत असून सदरहू भरणीमुळे त्यांचे अधिवास नष्ट होणे, कांदळवनाचा ऱ्हास आणि नैसर्गिक जलप्रवाहाचे अवरोधन यामुळे समुद्रकिनारी पूर आणि इतर आपत्तीचा धोका वाढला असून त्याचा परिणाम मुंबईच्या पर्यावरणीय सुरक्षेवर होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता लोखंडवाला बॅक रोड परिसरातील अनधिकृत भरणी त्वरित काढून टाकण्याची आवश्यकता, या क्षेत्रात पर्यावरणीय परिणाम मुल्यांकन घेण्यात येऊन संबंधित जमीन मालक आणि ठेकेदारांवर पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ आणि सीआरझेड नियम, २०११ अंतर्गत कडक कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

(७) **सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, डॉ. परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **दिव्यांग कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय आणि जिल्हा कार्यालये दिनांक १ मे, २०२५ पासून स्थापन करण्यात येणे, मात्र या विभागाची सद्य:स्थिती चिंताजनक असून ३६ जिल्ह्यांचा कारभार सांभाळण्यासाठी पूर्णवेळ अधिकारीच नियुक्त झाला नसल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास येणे, त्यात पहिल्या टप्प्यात १३ जिल्ह्यांना अधिकारी मिळाले, मात्र त्यांच्याकडेही शासनाने अतिरिक्त कार्यभार दिला असणे, २३ जिल्ह्यांचा कारभार वाऱ्यावर असणे, दिव्यांग कल्याण खात्याचा स्वतंत्र आकृतिबंध असावा, असे अपेक्षित असून यासाठी १९९६ पदांच्या आकृतिबंधाला मंत्रिमंडळाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ ला मंजुरी देणे, परंतु समाजकल्याण विभागातील दिव्यांग कल्याण डेस्कची संपूर्ण आस्थापना वर्ग झाली नसून ती दोन्ही विभागांत कार्यरत असणे, प्रत्येक जिल्ह्यांत स्वतंत्र अधिकारी आणि त्याला अनुसरून इतर पदांची आस्थापना करणे आवश्यक असताना ही पदे भरली गेली नसणे, राज्यात वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्यांची २२ पदे असून त्यांची वर्षानुवर्षे पदोन्नती झाली नसणे, त्यांना पदोन्नती दिली असती तर सर्व जिल्ह्यांना जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी हे पूर्णवेळ पद मिळाले असते, जिल्ह्यांमधील दिव्यांग कार्यालयांमध्ये कर्मचारी संख्याही अत्यंत अपुरी असणे, याची शासनाने तात्काळ दखल घेऊन पूर्णवेळ अधिकार, कार्यालयांमध्ये कर्मचारी यांची नियुक्ती करण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस)**
**खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१) उपमुख्यमंत्री

२) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

३) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), मंत्री

४) वैद्यकीय शिक्षण मंत्री

५) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

६) आदिवासी विकास मंत्री

७) माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री

८) महिला व बालविकास मंत्री

९) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

१०) ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

११) अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री

१२) वस्त्रोद्योग मंत्री

१३) सामाजिक न्याय मंत्री

१४) परिवहन मंत्री

१५) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

१६) सहकार मंत्री

१७) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

**सात : शासकीय विधेयक —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६५ - गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

आठ : (क) **(मंगळवार, दिनांक १ जुलै, २०२५, बुधवार, दिनांक २ जुलै, २०२५, गुरूवार, दिनांक ३ जुलै, २०२५ व शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** डॉ.मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, सर्वश्री विक्रम काळे, श्रीकांत भारतीय, कृपाल तुमाने, संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री किशोर दराडे, इद्रिस नायकवडी, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, पंकज भुजबळ, डॉ.परिणय फुके, सर्वश्री हेमंत

अप्रकाशित प्रत

पाटील, किरण सरनाईक, राजहंस सिंह, रणजितसिंह मोहिते-पाटील, दादाराव केचे, सदाशिव खोत, संजय केणेकर, अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंत खंडेलवाल, विक्रांत पाटील, संदीप जोशी, योगेश टिळेकर, धर्मगुरु राठोड, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर** )

"राज्यातील मुंबई, एमएमआरडीए, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर इ. महसुली जिल्हे व्यापारदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले असणे, मुंबई तर देशाची ग्रोथ इंजिन असणे, मुंबई आणि जेएनपीटी पोर्टनंतर वाढवण बंदर राज्याला आर्थिक महासत्ता बनविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल ठरणार असणे, याठिकाणी नव्या विमानतळाची उभारणी करण्याबरोबरच नवी मुंबई, नैनाच्या माध्यमातून तिसरी आणि वाढवण बंदर प्रकल्पाच्या ठिकाणी चौथी मुंबई वसविण्याचे प्रस्तावित असणे, मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदराजवळ प्रस्तावित असणे, वाढवण बंदरामुळे दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रीक टन मालाची हाताळणी करणे शक्य असणे, महाराष्ट्रासह देशाच्या विकासात हे बंदर 'गेमचेंजर' ठरणार असणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करुन वेगळी विकास नियंत्रण नियमावली तातडीने तयार करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेचे चतुर्थ श्रेणी कामगार तसेच गिरणी कामगार यांच्या घरांचा प्रश्न तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील कुर्ला येथील नेहरुनगर, टिळकनगर या म्हाडा वसाहतीतील अनेक इमारतींचा पुनर्विकास होऊन १० ते १५ वर्षे उलटल्यानंतरही त्यांना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई उपनगरातील जुन्या व अत्यंत मोडकळीस आलेल्या भाडेकरूंच्या इमारतींना महापालिकेने नोटीस दिल्यानंतर व महापालिकेने किंवा घरमालकाने तोडल्यानंतर १५-१५ वर्षे त्या तशाच अवस्थेत पडून असल्याचे निदर्शनास येणे, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या मोठया शहरांच्या मेगापॉलीस मेटाव्हर्स प्रकल्पाच्या मदतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन ही महानगरे जागतिक पटलावर उच्च दर्जाची व्हावी ही शासनाची महत्वांकाक्षा असणे, मुंबईसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ६४,७८३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असणे, "ग्रोथ हब" संकल्पनेद्वारे मुंबई महानगर प्रदेशात ७ जागतिक व्यापार केंद्रे विकसित करण्याची योजना असणे, "वेव्हज" परिषदेच्या माध्यमातून महाराष्ट्र आणि देशभरातील माध्यमे आणि मनोरंजन क्षेत्राला ग्लोबल प्लॅटफॉर्म प्राप्त होण्यासोबतच मुंबई जागतिक माध्यम-मनोरंजन उद्योगाची राजधानी म्हणून विकसित व्हावी हा शासनाचा निर्धार असणे, यामध्ये मेट्रो जाळयाचा विस्तार, रस्ते विकास व वाहतुक सुविधांचा समावेश असणे, मुंबई, पुणे आणि नागपूर मध्ये १४३.५७ कि.मी. चे मेट्रोमार्ग कार्यरत असणे, नवी मुंबई येथे २५० एकर क्षेत्रावर नाविन्यता नगर (इनोव्हेशन सिटी) उभारण्यात येणार असणे, पुणे शहरात पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्हयातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर विचार

अग्रिम प्रत

करण्याची आवश्यकता, पुण्यातील जुन्या ब्रिटीशकालीन वाडयांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतीमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी शहरे विकसित करण्याची व तेथील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, मुंबई, नागपूर व पुणे महानगरातील नागरिकांना पर्यावरणपूरक, शाश्वत, विनाअडथळा व वातानुकुलीत वाहतुक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण १४३.५७ कि.मी. लांबीचे मेट्रो मार्ग कार्यान्वित करण्यात आले असणे, ठाणे वर्तुळाकार मेट्रो मार्ग तसेच पुण्यातील स्वारगेट ते कात्रज विस्तार मार्गिका प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, पुणे मेट्रो रेल्वे टप्पा-२ अंतर्गत खडकवासला-स्वारगेट-हडपसर-खराडी आणि नळ स्टॉप-वारजे-माणिक बाग या दोन मार्गिकांचा ९,८९७ कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला असणे, मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या मेट्रो मार्गाचे काम दृष्टीक्षेपात असणे, नवी मुंबईतील उलवे येथे १,१६० हेक्टर क्षेत्रामध्ये नव्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबई आंतराराष्ट्रीय विमानतळाचे काम ८५ टक्के पूर्ण झालेले असणे, गडचिरोली हा विकसित जिल्हा बनला असून त्याठिकाणी खनिज संपत्तीचा योग्य वापर करण्यात येऊन 'गडचिरोली स्टील सिटी' हा महत्वाकांक्षी प्रकल्प तेथे साकारण्याचे प्रयोजन असणे जेणेकरुन त्या भागात मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती होऊ शकेल, मुंबई-नागपूर समृध्दी द्रुतगती मार्ग गोंदिया आणि गडचिरोलीला जोडण्याचे प्रस्तावित असणे, नागपूरच्या भोसले राजघराण्यातील राजे रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून आपल्या राज्यात परत आणण्यात राज्य शासनाला मिळालेले ऐतिहासिक यश, राज्यात एआय पॉलिसी, एआय विद्यापीठ, सायबर सिक्युरिटी इ. धोरणांची अंमलबजावणी करण्यात राज्य अग्रेसर असणे, महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेला भविष्यातील विकासासाठी जोडण्याचा या शासनाचा प्रयत्न असून सुखी, संपन्न, समृध्द, प्रगत, पुरोगामी सुधारणावादी महाराष्ट्र घडविण्यासाठी आणि महाराष्ट्राला अधिकाधिक समृध्दीकडे नेण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख)** **(गुरूवार, दिनांक ३ जुलै, २०२५ व शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** —

**सर्वश्री अंबादास दानवे,** सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, सर्वश्री अभिजित वंजारी, सचिन अहिर, अशोक उर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, जयंत आसगावकर, जगन्नाथ अभ्यंकर, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू)**

राज्यातील शेतकऱ्यांना सतत नैसर्गिक आपत्ती, बाजारातील अस्थिरता, अपुरा हमीभाव, बोगस बियाणे-खते, अपूर्ण नुकसान भरपाई, अपुरा कर्जपुरवठा आणि कर्जमाफीच्या अंमलबजावणीत होत असलेले दुर्लक्ष यामुळे मोठ्या

अग्रिम प्रत

अडचणींना सामोरे जावे लागणे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांची संख्या वाढविण्याची गरज असूनही नवीन समित्यांची स्थापना झालेली नसणे, 'AI आधारित कृषी धोरण' आणि 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजना केवळ घोषणापुरत्याच राहिल्या असणे, 'शेतकरी ओळख क्रमांक' बंधनकारक करून अनेकांना योजनांपासून दूर ठेवले जात असणे, खते निरिक्षकांच्या अधिकारात ६० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला असल्याने बोगस बियाणे आणि खते यामध्ये मोठ्या प्रमाणावर फसवणूक वाढल्याने सदरहू निर्णय रद्द करण्याची आवश्यकता, आत्महत्याग्रस्त कुटुंबांना वेळेवर मदत मिळत नसणे, कामगार क्षेत्रात श्रम कायद्यांमधील बदल, बोगस लाभार्थी, योजनांमधील अनियमितता आणि गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसाठी कोणतेही कायदेशीर संरक्षण नसणे, अनेक पारंपरिक आणि असंघटित कामगार विमा, निवृत्ती वेतन व सुरक्षा सुविधा यांपासून वंचित असणे, शालेय शिक्षण विभागात शासकीय शाळांची दुरवस्था, पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षक भरतीतील दिरंगाई, अकरावी प्रवेश प्रक्रियेमधील गोंधळ, आणि बोगस शालार्थ आयडी वापरून अपहार होत असणे, मुंबईत धारावी पुनर्विकास प्रकल्पात अदानी समूहाला दिलेल्या सवलती, एमएमआरडीए च्या प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता, गिरणी कामगारांच्या पुनर्विकासात झालेली फसवणूक, या सर्व प्रश्नांकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका".

**नऊ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री दादाराव केचे, प्रविण दरेकर, श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"आर्वी व आष्टी तालुक्यातील मौजे अंतोरा, जोलवाडी, देलवाडी, अंबिकापुर (जि.वर्धा) येथील रस्ता बांधकामाकरीता भूसंपादनाची प्रकरणे विशेष भूसंपादन अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आलेली असणे, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, वर्धा यांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१७ रोजी भूसंपादनाचे प्रस्ताव परत करून शासन निर्णयानुसार खाजगी वाटाघाटी प्रकरणे सुधारित प्रस्तावात सादर करण्याचे निर्देश प्राप्त होणे, त्यानुसार सुधारीत मूल्यांकन मोबदल्याची रुपये १० कोटी ६ लक्ष २९ हजार ५०२ इतकी रक्कम असणे, याकरिता जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने मान्यता दिलेल्या मूल्यांकनानुसार लेखाशिर्ष ३०५४/२४९९ ग्रामीण भाग व पूल रस्ते दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना".

(२) **सर्वश्री जगन्नाथ अभ्यंकर, किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्य शासनाने अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील रिक्त मंजूर पदे भरण्यावर दिनांक २ मे, २०२२ पासून बंदी घातली असून, अल्पसंख्यांक संस्थांमधील रिक्त पदे भरण्यावरसुद्धा बंदी घातली गेली असणे,

दिनांक २० जून,२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये नियुक्तीवरील बंदी तात्पुरत्या कालावधीकरीता उठविण्यात आली असणे, तसेच अल्पसंख्यांक संस्थांवरील पदे भरण्याबाबत घातलेली बंदी दिनांक १३ जुलै, २०१६ रोजीच्या शासन आदेशान्वये उठविण्यात आली असणे आणि दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या शासन आदेशान्वये पुन्हा बंदी घातली जाणे , अशा प्रकारे साधारणत: १० - ११ वर्षे अनुदानित शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेतरांची हजारो पदे रिक्त राहिल्याने उच्च शिक्षित पात्र उमेदवार नोकरीपासून वंचित असणे, शासन निर्णय दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ नुसार बिगर अल्पसंख्यांक संस्थेच्या अनुदानित शाळांतील रिक्त जागा पोर्टलद्वारे भरण्याचे शासनाने आदेश देण्यात आले असणे, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली १९८१ मधील नियम ९ (४) मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करतांना उमेदवाराचे वय नियुक्तीच्या वेळी १८ वर्षापेक्षा कमी असता कामा नये एवढाच उल्लेख असणे, सदर नियमावली मध्ये कमाल वयोमर्यादा नमूद केलेली नसणे, नियमावलीतील सदर तरतूदी दुर्लक्षुन दिनांक ७ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या शासन निर्णयामध्ये कमाल वयोमर्यादा दर्शविली असणे व मागील १०-११ वर्षे रिक्त पदांची भरती बंद असल्यामुळे १० वर्षांपूर्वी डी.एड, बी.एड ही अध्यापन शास्त्रातील अर्हताप्राप्त तरुण - तरुणींचे वयोमर्यादा ओलांडल्याने शिक्षक होण्याचे स्वप्न दुरापास्त होणे, त्यामुळे शिक्षकांची रिक्त पदे भरण्यावर घातलेली बंदी आणि महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी, सेवाशर्ती, नियमावली, १९८१ मधील नियम ९ (४) मधील तरतूद यांचा साकल्याने विचार करून शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ४ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानपरिषद

असुधारित प्रत